**सभेपुढील विषय :**

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन २०१८ – १९ वर्षातील महाविद्यालयाचे सुधारित अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

३. महाविद्यालयाच्या प्राचार्य निवासस्थान विस्तारित इमारतीच्या पहिला मजला इमारत बांधकामाच्या एकूण रक्कम ९,४६,८४०/- च्या प्लान इस्टीमेटला मंजूरी देणे.

४. महाविद्यालय पाणीपुरवठाची पाईपलाईन खराब झाल्याने नविन पाईपलाईन कामकाजास व एकूण खर्च रक्कम रू ४,७६,४४५/- च्या प्लान इस्टीमेटला मंजूरी देणे.

५. महाविद्यालयाच्या नविन रयत शताब्दी इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकामास संस्थेकडून मिळालेल्या मजूरीदराच्या बांधकामाऐवजी मटेरियलसह इमारत बांधकामास परवानगी मिळणेसाठी ठरावास मंजूरी देणे.

(२)

६. महाविद्यालयाच्या IQAC कडून आलेल्या शिफारसीवर चर्चा करून निर्णय घेणे.

७. NAAC कडून महाविद्यालयाचे द्वितीय मूल्यांकन (Second Cycle) करून घेण्यासाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

८. NAAC बंगलोर यांच्याकडे महाविद्यालयाचा AQAR सन २०१७ – १८ चा रिपोर्ट पाठवून दिलेला आहे. त्यास मान्यता घेणे.

९. महाविद्यालयाच्या सेवक निवासस्थान व प्राचार्य निवासस्थान भोवती जाळीचे तार कुंपण करण्याच्या कामास व त्या कामाच्या प्लान इस्टीमेट करण्यास मंजूरी घेणे.

१०. महाविद्यालय इमारत परिसराच्या पश्चिम बाजूस वृक्ष लागवड करून तारेचे कुंपण करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

११. बॉटनीकल गार्डन तयार करण्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चास मान्यता देणे.

१२. यु.जी.सी. च्या १२ प्लॅनमधील IQAC स्कीमसाठी प्राप्त झालेल्या व खर्च केलेल्या एकूण तीन लाख अनुदानापैकी यु.जी.सीच्या पत्र क्र. F.NO:-76-0370/14(WRO) ने अमान्य करून रिफंड करावयास सांगितलेली रक्कम रूपये एक लाख तेवीस हजार पाचशे व त्यावरील व्याज रिफंड करण्याबाबत चर्चा करून रक्कम रिफंड करण्यास मंजूरी देणेबाबत . . . . .

१३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेस येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.

कळावे. ही विनंती.

आपला विश्वासू

प्राचार्य/ सचिव
महाविद्यालयविकास समिती,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
मोखाडा, जि .पालघर

O/C

Arts, Science & Com. College Mokhada

रयत शिक्षण संस्थेचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
मोखाडा, जि. पालघर-४०१ ६०४.

(१)

# महाविद्यालय विकास समिती सभा

दि. ६/०६/२०१९

महाविद्यालय विकास व्यवस्थापन समितीची सन २०१८-१९ वर्षातील दुसरी सभा दि.६/६/२०१९ रोजी दु. १.०० वा. मा. चेअरमन रयत शिक्षण संस्था सातारा यांचे चेअरमन प्रतिनिधी मा. रामशेठजी ठाकूर सो. यांचे अध्यक्षतेखाली महाविद्यालयात संपन्न झाली.

या सभेस खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| अ. न. | सदस्याचे नाव | | सही |
|---|---|---|---|
| ०१ | मा. रामशेठ ठाकूर (चेअरमन प्रतिनिधी ) | चेअरमन | |
| ०२ | मा. आमदार बाळाराम पाटील (सचिव प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०३ | मा. ॲड. भगिरथ शिंदे (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०४ | मा. आमदार प्रशांत ठाकूर (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०५ | मा. ॲड. देविदास पांडूरंग पाटील (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०६ | मा. कुणाल लाडे (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०७ | प्रा. प्रफुल्ल मनोहर धावणे (प्राचार्य नियुक्त विभाग प्रमुख ) | सभासद | |
| ०८ | प्रा. प्रकाश जीवन शिंदे (प्राध्यापक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०९ | प्रा. जनार्धन भाऊ वारघडे (प्राध्यापक प्रतिनिधी ) | सभासद | |
| १० | प्रा.ममलय्या अमोल बलभीम (प्राध्यापक प्रतिनिधी ) | सभासद | |
| १० | श्री. अविनाश हरिचंद्र पाटील (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) | सभासद | |
| ११ | प्राचार्य, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा | सचिव | |

रयत शिक्षण संस्थेचे,

कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा

**दि.०६/०६/२०१९ रोजीच्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेचा इतिवृत्त अहवाल**

दि.०६/०६/२०१९ रोजीच्या सभेचे नियोजित अध्यक्ष मा. रामशेठजी ठाकूर यांनी स्वीकारावे अशी विनंती प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव यांनी केली. सदरची विनंती मान्य करून मा. रामशेठजी ठाकूर साहेब यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारून सभेचे कामकाज सुरु केले.

**विषय क्र. १. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.**

**ठराव** - दि. ११/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त श्री. धावणे पी. एम. यांनी सभागृहापुढे वाचन करून इतिवृत्त कायम करणेसाठी सभेपुढे ठेवले. सदरच्या इतिवृत्तातील सर्व ठरावांवर चर्चा होऊन सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. २.**

**सन २०१८-१९ वर्षातील महाविद्यालयाचे सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी देणे-**

**ठराव-** आर्थिक वर्ष सन २०१८-१९ या वर्षासाठी महाविद्यालयाने सुधारित अंदाजपत्रक तयार करून ते मंजुरी साठी संस्थेकडे पाठविण्यात आले होते.त्यास संस्थेने ऑडीट डीपार्टमेंट मार्फत मा.सचिव सो.यांचेकडून या अंदाजपत्रकाच्या सिनियर, व्यवसाय अभ्यासक्रम,पी.जी.विभागाच्या खालील तपशिलाच्या एकूण जमा-खर्चाच्या रक्कमेस मंजुरी दिली आहे.अंदाजपत्रकातील जमा-खर्चाच्या तपशिलाचे समितीने अवलोकन करून त्यावर चर्चा करून या सर्व रक्कमेस **समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.**

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

| | |
|---|---|
| **सिनियर विभाग** | **२,४६,३०,७००/-** |
| **व्यवसाय अभ्यासक्रम** | **४५,३३,४००/-** |
| **पी.जी.विभाग** | **१,७०,८००/-** |

**विषय क्र. ३.**

**महाविद्यालयाच्या प्राचार्य निवासस्थान विस्तारित इमारतीच्या पहिला मजला इमारत बांधकामाच्या एकूण रक्कम ९,४६,८४०/- च्या प्लान इस्टीमेटला मंजूरी देणे.**

**ठराव-** या महाविद्यालयाच्या प्राचार्य यांचेसाठी संस्थेने प्राचार्य निवासस्थान दिलेले आहे.या निवासस्थानाची इमारत बांधून १२ वर्ष झाली आहे.त्यामुळे सदरचे निवासस्थान इमारतीवरील स्लेब पावसाळ्यातील पाण्यामुळे गेले दोन/तीन वर्षापासून जादा प्रमाणात गळत आहे. सतत गळतीमुळे या निवासस्थानात पाणी साचते. त्यामुळे या प्राचार्य निवासस्थानात प्राचार्य यांची रहाण्याची गैरसोय होत होती . निवासस्थानात सुस्थितीत राहनेसाठी इमारतीवरील स्लेबवर पत्र्याची शेड करणेच्या कामाचे प्लान व इस्टीमेटला स्थानिक व्यवस्थापन समितीने दि.१४/१/२०१७ रोजीच्या सभेत ठराव क्र.१२ ने या कामासाठी मंजुरी दिलेली आहे. परंतु महाविद्यालय विकास समितीने या पत्राशेड कामाऐवजी प्राचार्य निवास्थानाच्या इमारतीवर पहिला मजला इमारतीचे बांधकाम करावे असे सूचित केल्याने या इमारत बांधकामाचे एकूण **प्लान –इस्टीमेट रक्कम रु.९,४६,८७०/- ला व या इमारत बांधकामासाठी समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.**

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ४.**

**महाविद्यालय पाणीपुरवठाची पाईपलाईन खराब झाल्याने नविन पाईपलाईन कामकाजास व एकूण खर्च रक्कम रू ४,७६,४४५/- च्या प्लान इस्टीमेटला मंजूरी देणे.**

**ठराव-** या महाविद्यालयाने पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी सन २००३ मध्ये स्वतःची विहीर बांधलेली आहे. या विहिरीतून महाविद्यालय इमारतीपर्यंत आणि तेथून सेवक व प्राचार्य निवासस्थाना पर्यंत पाणी पुरवठासाठी पाईप लाईन केलेली होती. परंतु सदरची पाईप लाईन सद्यस्थितीत पूर्णपणे खराब झालेली आहे.त्यामुळे नवीन पाईप लाईन करणे आवश्यक असल्याबाबत महविद्यालय विकास समितीशी चर्चा करून या कामासाठी प्लान व इस्टीमेट तयार केले असून या प्लान –इस्टीमेट ची रक्कम रु.४,७६,४४५,/- ला समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ५.**

**महाविद्यालयाच्या नविन रयत शताब्दी इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकामास संस्थेकडून मिळालेल्या मजूरीदराच्या बांधकामाऐवजी मटेरियलसह इमारत बांधकामास परवानगी मिळणेसाठी ठरावास मंजूरी देणे.**

**ठराव -** महाविद्यालयाने रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षात महाविद्यालयासाठी बांधावयाच्या "रयत शताब्दी"इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकामाचे एकूण रक्कम रु.२,०१,९४,०००/- (अक्षरी- दोन कोटी एक लाख चौर्यानव हजार) चे प्लान व इस्टीमेट तयार करून संस्थेकडे मंजुरीसाठी सादर केलेले होते. या इमारत बांधकामास संस्थेकडून मजुरी दराने (डिपार्टमेंटली) बांधकाम करण्यास मंजुरी मिळालेली होती. परंतु मोखाडा हा भाग आदिवासी व अतिदुर्गम डोंगराळ भाग असल्याने येथे वीट, रेती वाहतूक महसूल परवाने नसल्याने, सिमेंट व इतर मटेरियल वेळेवर उपलब्ध होण्यास गैरसोयीचे असल्याने येथील परिस्थितीचा विचार करता या महाविद्यालयाच्या नवीन

बांधावयाच्या "रयत शताब्दी"इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकामास मजुरीदरा (डिपार्टमेंटली) ऐवजी मटेरियलसह ठेकेदारीपद्धतीने इमारत बांधकाम करण्यास संस्थेच्या दि.१६/२/२०१९ रोजीच्या पत्रास अनुसरून महाविद्यालय विकास समितीने सदर कामास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.- ६.**

**महाविद्यालयाच्या IQAC कडून आलेल्या शिफारसीवर चर्चा करून निर्णय घेणे.**

**ठराव-** सन २०१८-२०१९ वर्षाच्या च्या **IQAC** अॅकेडेमिक सभेतील सुचविलेल्या खालील मुद्द्यांतील विषयांवर समितीने चर्चा केली.

१. संगणक कक्ष अद्यावत ठेवून तेथे **ICT** सोयी सुविधा देणे.
२. ग्रंथालय संकेतस्थळ लिंक तयार करणे
३. सर्व सुविधा देऊन प्रयोगशाळा अद्यावत ठेवणे. होणार्यांची
४. एन. एस. एस. व जिमखाना विभागासाठी स्वतंत्र खोली / हॉल देऊन त्यांना अद्यावत ठेवणे.
५. महाविद्यालयाची वेबसाईट डायनॅमिक करून सर्व बाबींनी अद्यावत ठेवणे.

या मुद्द्यांवरील शिफारशीवर समितीने चर्चा करून वरील मुद्द्यांच्या विषयांस समितीने सर्वानुमते मंजुरी दिली. तसेच सन २०१८-१९ चा AQAR पाठविण्यास मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.- ७.**

**NAAC कडून महाविद्यालयाचे द्वितीय मूल्यांकन (Second Cycle) करून घेण्यासाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

**ठराव-** महाविद्यालायचे प्रथम NAAC मुल्यांकन सन २०१३-१४ मध्ये झाले आहे. त्यामध्ये महाविद्यालयाला २.२१ हि ग्रेड मिळाली. फेब्रुवारी २०१९ मध्ये प्रथम मुल्यांकनाची ५ वर्षे पूर्ण होतात. महाविद्यालयाचे द्वितीय NAAC मूल्यांकन करणे आवश्यक आहे. सदर NAAC च्या द्वितीय मूल्यांकनासाठी प्रथम NAAC मुल्यांकन समितीने सुचविलेली लँग्वेज लॅब स्थापित करणे आवश्यक आहे. हि सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नवीन इमारत होणे गरजेचे आहे. त्यानुसार इमारत उपलब्ध झाल्यास लँग्वेज लॅब ची सुविधा तसेच इतर सर्व आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे सोपे होईल. या चर्चेस समितीने सर्वानुमते मंजुरी दिली

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

(५)

**विषय क्र.- ८.**

**NAAC बंगलोर यांच्याकडे महाविद्यालयाचा AQAR सन २०१७ – १८ चा रिपोर्ट पाठवून दिलेला आहे. त्यास मान्यता घेणे.**

**ठराव-** NAAC बंगलोर यांच्याकडे महाविद्यालयाचा AQAR सन २०१७ – १८ चा रिपोर्ट पाठवून दिलेला आहे. यास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ९**

**महाविद्यालयाच्या सेवक निवासस्थान व प्राचार्य निवासस्थान भोवती जाळीचे तार कुंपण करण्याच्या कामास व त्या कामाच्या प्लान इस्टीमेट करण्यास मंजूरी घेणे.**

**ठराव-** सेवक निवासस्थान व प्राचार्य निवास स्थान यांच्या सुरक्षिततेसाठी जाळीचे तार कुंपण आवश्यक असल्याने समितीने या बाबीचा विचार करून या कामकाजास व प्लान इस्टीमेट करण्यास समितीने सर्वानुमते मंजुरी दिलेली आहे.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र १०.**

**महाविद्यालय इमारत परिसराच्या पश्चिम बाजूस वृक्ष लागवड करून तारेचे कुंपण करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

**ठराव-** महाविद्यालय इमारत परिसराच्या पश्चिम बाजूस मोकळी जागा असल्याने वृक्ष लागवड करणे सोयीचे असल्याने या वृक्ष लागवडी भोवती तर कुंपण आवश्यक असल्याने त्यावर समितीने चर्चा करून या कामास सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ११**

**बॉटनीकल गार्डन तयार करण्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चास मान्यता देणे.**

**ठराव-** महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाकडील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासाठी बॉटनीकल गार्डन ची आवश्यकता असल्याने या गार्डन उभारणीसाठी अंदाजित रक्कम रु. ४६०००/- व या गार्डन भोवती तार कुंपणासाठी अंदाजित रक्कम रु. ३००००/- च्या खर्चास व कामकाजास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. १२**

**यु.जी.सी. च्या १२ प्लॅनमधील IQAC स्कीमसाठी प्राप्त झालेल्या व खर्च केलेल्या एकूण तीन लाख अनुदानापैकी यु.जी.सीच्या पत्र क्र. F.NO:-76-0370/14(WRO) ने अमान्य करून रिफंड करावयास सांगितलेली रक्कम रूपये एक लाख तेवीस हजार पाचशे व त्यावरील व्याज रिफंड करण्याबाबत चर्चा करून रक्कम रिफंड करण्यास मंजूरी देणेबाबत.**

**ठराव-** महाविद्यालयास यु.जी.सी. च्या १२ प्लॅनमधील IQAC स्कीमसाठी एकूण रक्कम रु. ३०००००/- (तीन लाख ) अनुदान मिळालेले होते. त्याचे विनियोग विनियोग प्रमाणपत्र यु.जी.सी ला सादर केलेले होते. परंतु वरील विषयाच्या पत्रानुसार यु.जी.सी ने १, २३, ५००/- (एक लाख तेवीस हजार पाचशे ) इतकी रक्कम अमान्य केलेली आहे. सदरची रकम व त्यावरील होणारे व्याज अंदाजित रक्कम रुपये ३६,३८३/- (छत्तीस हजार तीनशे त्र्याऐंशी ) अशी एकूण रक्कम १, ५९, ८८३/- (एक लाख एकोणसाठ हजार आठशे त्र्याऐंशी) यु.जी.सी ला रिफंड करण्यास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. १३.**

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेस येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.**

**विषय क्र. १.**

**'रयत शताब्दी' नवीन इमारत बांधकामासाठी जागा निश्चिती करणे.**

**ठराव-** रयत शताब्दी इमारतीसाठी महाविद्यालय विकास समितीने प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून जुन्या मुख्य इमारतीच्या व मुलींच्या स्वछतागृहासामोरील बाजूस व वाहन पार्किंग शेड ला लागून पूर्व- पश्चिम दिशेने दक्षिणेकडे तोंड करून इमारत बांधण्याची जागा समितीच्या सर्व सदस्यांनी सर्वानुमते निश्चित केली आहे.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. २.**

**महाविद्यालय रयत शताब्दी इमारतीच्या तळमजला व पहिला मजला बांधकामाच्या नवीन SSR नुसारच्या रक्कम रु.२,४७,४९,६३०/- च्या प्लान-इस्टीमेटला मंजुरी देणे.**

**ठराव-** या महाविद्यालयाने सन २०१३-१४ मध्ये विज्ञान शाखा अनुदानित तत्वावर सुरु केलेली आहे.या विज्ञान शाखेसाठी सुसज्ज आवश्यक वर्ग खोल्या व प्रयोगशाळेसाठी इमारतीची आवशकता आहे.त्यासाठी महाविद्यालयाने रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षात महाविद्यालयासाठी बांधावयाच्या "रयत शताब्दी"इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारतीचे श्री.पात्रेकर,सातारा यांचेकडून प्लान व इस्टीमेट तयार करून घेतलेले असून, या कामाचे एकूण रक्कम रु.२,०१,९४,०००/- (अक्षरी- दोन कोटी एक लाख चौर्यानवहजार) रक्कमेचे प्लान व इस्टीमेटला महाविद्यालय विकास समितीने दि.११/८/२०१८ रोजीच्या सभेतील ठराव क्र.७ ने या इमारत बांधकामाच्या तळमजला व पहिला मजला इमारतीच्या प्लान व इस्टीमेट रकमेस मंजुरी दिलेली होती. परंतु संस्थेकडील पदाधिकारी यांचेकडील झालेल्या चर्चेनुसार आणि महाविद्यालयाच्या या इमारत बांधकामाच्या प्लान व

(७)

इस्टीमेटमध्ये नवीन SSR नुसार बदल झाल्याने नवीन रक्कम रू.२,४७,४९,६३०/च्या -प्लान व इस्टीमेट तयार केले आहे. महाविद्यालय विकास समितीने प्रथम बनविलेल्या प्लान इस्टीमेट रक्कम रु.२,०१,९४,०००/- ऐवजी सुधारीत बनविलेले प्लान – इस्टीमेट रक्कम रु. २,४७,४९,६३०/- (अक्षरी रु.दोन कोटी सत्तेचाळीस लाख एकोणपन्नास हजार सहाशे तीस फक्त )च्या रकमेस ,सदर बांधकामास व खर्चास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ३. मोखाडा महाविद्यालयातील इमारत बांधकामासाठी मिळालेल्या ३ कोटी देणगी रकमेबाबत आभार.**

**ठराव-** रयत शिक्षण संस्थेच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा करिता इमारत बांधकामासाठी मा. शरद पवार साहेब यांच्या मार्फत मिळालेली रु. १ कोटी रक्कम तसेच मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या कडून मिळणाऱ्या रु. १ कोटी देणगी रक्कम व संस्थेमार्फत मिळणाऱ्या रु. १ कोटी रक्कम अशा एकूण रु. ३ कोटी मंजूर केलेल्या देणगी रकमेबद्दल महाविद्यालय विकास समितीने आनंद व्यक्त करून मा. शरद पवार साहेब व रामशेठ ठाकूर साहेब आणि संस्थेचे आभार मानून देणगी ठराव सर्वानुमते मंजूर केला.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ४.**

**माहे मे २०१९ रोजी काम केलेल्या तासिका तत्वावरील सेवकांच्या पगार मानधन रकमेच्या खर्चास मंजुरी देणे.**

**ठराव-** मुंबई विद्यापीठाच्या सत्र नियोजनामुळे बहुसंख्य परीक्षा या एप्रिल च्या मध्यावर सुरु होऊन संपूर्ण मे महिन्यापर्यंत आहेत. विद्यापीठाची प्रथम व द्वितीय वर्षाची परीक्षा / पेपर तपासणी/ निकाल / परीक्षा सुपरव्हीजन व इतर अनुषंगिक काम काजासाठी शाखेस खालील दोन सेवकांची आवश्यकता असल्याने या सेवकांना माहे मे २०१९ च्या पगार मानधन रकमेस व खर्चास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

| अ. न. | सेवकाचे नांव | महिना मानधन रक्कम |
|---|---|---|
| १. | डॉ. मगदूम बी. एम. | रु. १४, ०००/- |
| २. | श्री. गोजारे एस. एम. | रु. १४, ०००/- |

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

(2)

**विषय क्र. ५.**

**महाविद्यालयाच्या प्राचार्य केबिनला दीड टनाच्या ए. सी. खरेदी करणेस मंजुरी देणे.**

**ठराव-** महाविद्यालयाच्या पप्राचार्य केबिन ला दीड टनाच्या ए. सी. खरेदी करणेस मंजुरी देणे. महाव्द्यालायातील प्राचार्य कक्षा मध्ये उन्हाळा ऋतू मध्ये अत्यंत उष्णता भासते. त्यामुळे दीड टन इतक्या क्षमतेचा ए. सी. बसविण्यासाठी समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र. ६.**

**NAAC ला सामोरे जाण्याबाबत..**

**ठराव-** NAAC साठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्धतेसाठी नवीन इमारत होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरच्या इमारतीचे आवश्यक बांधकाम पूर्ण झाल्यानंतर NAAC ला सामोरे जाने योग्य होईल यास समितीने सर्वानुमते मान्यता दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**कळावे,**

**चेअरमन**
**महाविद्यालय विकास समिती**

Art's, Science & Com. College Mokhada

**प्राचार्य/ सचिव**
प्राचार्य
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
मोखाडा, जि. पालघर

रयत शिक्षण संस्थेचे

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा.

स्थापना : जून १९८४

(उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम - जे. १८. ०२. ९०१)

नॅक मूल्यांकन - 'ब' श्रेणी

संस्थापक - पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (डी.लिट.)

प्राचार्य
डॉ. जे. जी. जाधव
(एम.ए., एम.फिल., पीएच.डी.)

जा. नं. : ६२९/२०१९-

दिनांक : २५/०२/२०२०

प्रति,

मा.सर्व मान्यवर ,

चेअरमन / सदस्य

सदस्य, महाविद्यालय विकास समिती,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

मोखाडा, जि .पालघर.

**विषय : महाविद्यालय विकास समितीच्या सन २०१९-२० मधील दि.२९/०२/२०२० रोजीच्या सभेस उपस्थित राहणेबाबत.....**

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा महाविद्यालयाच्या " महाविद्यालय विकास समितीची " **सन २०१९-२० मधील सभा शनिवार दि.२९/०२/२०२०** रोजी दुपारी ३.००वाजता महविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. रामशेठ ठाकूर साहेब, यांचे अध्यक्षतेखाली विभागीय कार्यालय, रयत शिक्षण संस्था,रायगड विभाग,कामोठे-पनवेल येथे बैठक आयोजित केलेली आहे.कृपया आपण या सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय :**

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. महाविद्यालय "रयत शताब्दी" दोन मजली नवीन इमारत बांधकामासाठी पुरवठा धारकांकडून मटेरियलसह (ठेकेदारी पद्धतीने) मागविण्यात आलेल्या सीलबंद निविदा उघडणे बाबतची प्रक्रिया (Tender Opening Process) कामकाज.

३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेस येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.

कळावे. ही विनंती.

O/C

Art's, Science & Com. College * Mokhada *

आपला विश्वासू

प्राचार्य/ सचिव

महाविद्यालय विकास समिती,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

मोखाडा, जि .पालघर

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"

महाविद्यालयाच्या "रयतशताब्दी" नवीन इमारत बांधकामाच्या निविदा प्रक्रिया बैठक दि.२९/२/२०२० रोजी दुपारी ३ वा आयोजित केलेल्या बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

# कमिटी उपस्थिती पत्रक.

| अ.क्र | पदाधिका-याचे नाव | पदानाम | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | मा. रामशेठ ठाकूर साहेब | चेअरमन | [signature] |
| २ | मा. ॲड. भगिरथ शिंदे सो | सभासद | [signature] |
| ३ | मा. आ. बाळाराम पाटील सो | सभासद | — |
| ४ | मा. आमदार प्रशांत ठाकूर सो | सभासद | — |
| ५ | मा. ॲड. देविदास पांडूरंग पाटील (स्थानिकप्रतिनिधी) | सभासद | — |
| ६ | मा. कुणाल लाडे (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | — |
| ७ | मा. विभागीय अधिकारी , रायगड विभाग,पनवेल. | कार्यालय | [signature] |
| ८ | प्रा. प्रकाश जीवन शिंदे (प्राध्यापक प्रतिनिधी ) | सभासद | [signature] |
| ९ | श्री.अविनाश हरिचंद्र पाटील (शिक्षकेतर प्रतिनिधी ) | सभासद | [signature] |
| १० | श्री. निखिल पात्रेकर ,सातारा | आर्किटेक | [signature] |
| ११ | श्री.महामुनीए.व्ही. क.भा.पा.महाविद्यालय,वाशी | बिल्डिंग सुपरवायझर | [signature] |
| १२ | मा.डॉ.जे.जी.जाधव | सचिव | [signature] |
| १३ | | | |

**रयत शिक्षण संस्थेचे,**

**कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा**

**दि.२९/२/२०२० रोजीच्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेचा इतिवृत्त अहवाल -**

महाविद्यालय "रयत शताब्दी" दोन मजली नवीन इमारत बांधकामाच्या निविदा प्रक्रिया बैठक आज दि.२९/०२/२०२० रोजी मा.रामशेठ ठाकूर साहेब, चेअरमन,मॅनेजिंग कॉन्सील सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा व चेअरमन, महाविद्यालय विकास समिती,मोखाडा महाविद्यालय यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय कार्यालय,रायगड विभाग,कामोठे (पनवेल) येथे बैठक आयोजित करण्यात आलेली होती.या बैठकीस महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ,तसेच तीन ठेकेदारसह विभागीय अधिकारी रायगड विभाग, बिल्डींग सुपरवायझर रायगड विभाग व आर्किटेक्चर,सातारा उपस्थित होते. तसेच मा.रामशेठ ठाकूर साहेब यांनी अध्यक्षस्थान स्विकारून बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र. १. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.**

**ठराव** - दि. ०६/०६/२०१९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव यांनी सभागृहापुढे वाचन करून इतिवृत्त कायम करणेसाठी सभेपुढे ठेवले. सदरच्या इतिवृत्तातील सर्व ठरावांवर चर्चा होऊन सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.२- महाविद्यालय "रयत शताब्दी" दोन मजली नवीन इमारत बांधकामाच्या निविदा प्रक्रिया उघडनेबाबत निर्णय -**

**ठराव-** कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,मोखाडा या महाविद्यालयाच्या " रयत शताब्दी " नवीन इमारतीच्या निविदा उघडणे बाबत "रयत शताब्दी" दोन मजली नवीन इमारत बांधकामासाठी दैनिक पुढारी नाशिक व मुंबई या वृत्तपत्रात महाविद्यालयाने दि.१०जुलै २०१९ रोजी दिलेल्या जाहिरातीनुसार खालीलप्रमाणे ४ (चार)निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१) प्रभात कन्स्ट्रक्शन,मोखाडा

२) साहिल कन्स्ट्रक्शन, मोखाडा

३) फाईनटेककन्स्ट्रक्शन कंपनी, (डोंबिवली(पूर्व )

४) अटलरियलटेक प्राय.लि. नाशिक

वरीलप्रमाणे प्राप्त निविदा सर्व टेंडर सादर करणाऱ्या ठेकेदार यांना निविदा सीलबंद असल्याची खात्री करून देऊन सर्वांच्या समक्ष व उपस्थितीत निविदा फोडण्यात आल्या. या निविदांमध्ये निविदाधारकांनी बांधकामाचे जे दर नमूद केलेले होते , त्यानुसार प्रत्येक निविदा धारकाचे इमारत बांधकामाचे दरपत्रका नुसार तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

(२)

| अनु.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदेतील एकूण दर |
|---|---|---|
| १. | प्रभात कन्स्ट्रक्शन,मोखाडा | २,६६,२२,९७७/- |
| २. | साहिल कन्स्ट्रक्शन, मोखाडा | २,३८,२६,३०७/- |
| ३. | फाईनटेककन्स्ट्रक्शन कंपनी, (डोंबिवली(पूर्व ) | २,५३,४६,११३/- |
| ४. | अटलरियलटेक प्राय.लि. नाशिक | २,४२,७०,५६५/- |

वरील सर्व निविदा धारकांपैकी "रयत शताब्दी" दोन मजली नवीन इमारत बांधकामासाठी आलेल्या निविदेतील सर्व ठेकादार यांच्याकडील दर व बांधकाम इस्टीमेट रक्कम रु.२,४७,४९,६३०/- नुसार **साहिल कन्स्ट्रक्शन, मोखाडा** या ठेकेदाराकडील निविदेतील दराची एकूण रक्कम रु. २,३८,२६,३०७/-(अक्षरी रु.दोन कोटी अडतीस लाख सव्हीस हजार तीनशे सात फक्त) ही सर्वात कमी होती.त्यामुळे त्यांचेकडील दर हे कमी (लोएस्ट) असल्याने मा. अध्यक्ष यांनी सर्व कमिटी सदस्य व उपस्थित ठेकेदार यांच्याशी चर्चा केली. त्यानुसार **साहिल कन्स्ट्रक्शन, मोखाडा** यांनी भरलेल्या निविदा दरामध्ये मटेरीयलसह एकूण रक्कम रु. **२,३८,२६,३०७/-/-(अक्षरी रु.दोन कोटी अडतीस लाख सव्हीस हजार तीनशे सात फक्त)** च्या दराची निविदा रक्कम सर्वात कमी असल्याने **साहिल कन्स्ट्रक्शन, मोखाडा** यांची निविदा कमिटीच्या सर्व सदस्यांनी सर्वानुमते मंजुर केली.

- ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. ३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेस येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.

**निरंक**

( मा. रामशेठ ठाकूर सो.)
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,मोखाडा.
चेअरमन
महाविद्यालय विकास समिती,

Art's, Science & Com. College
Mokhada

प्राचार्य
प्राचार्य
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
मोखाडा, जि. पालघर

रयत शिक्षण संस्थेचे

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा.

स्थापना : जून १९८४

(उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम - दि. १८. ०२. २०१)

नॅक मूल्यांकन - 'ब' श्रेणी

संस्थापक - पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (डी.लिट.)

प्राचार्य
डॉ. जे. जी. जाधव
(एम.ए., एम.फिल., पीएच.डी.)

जा. नं. : १०५/२०२०-२

दिनांक : ०४/०९/२०२०

प्रति,

मा.सर्व मान्यवर ,

चेअरमन / सदस्य

सदस्य, महाविद्यालय विकास समिती,

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

मोखाडा, जि .पालघर.

**विषय : महाविद्यालय विकास समितीच्या सन २०२० – २१ मधील दि.०८/०९/२०२० रोजीच्या सभेस उपस्थित राहणेबाबत. . . . .**

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा महाविद्यालयाच्या " महाविद्यालय विकास समितीची " सन २०२० – २१ मधील सभा मंगळवार दि.०८/०९/२०२० रोजी दुपारी १२.३० वाजता महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. रामशेठ ठाकूर साहेब, यांचे अध्यक्षतेखाली महाविद्यालयात आयोजित केलेली आहे. कृपया आपण या सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय :**

**१.** मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

**२.** सन २०२०-२१ शैक्षणिक वर्षतील झालेल्या प्रवेश संख्या यावर चर्चा करणे.

**३.** सन २०१९-२० वर्षातील महाविद्यालयाचे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

**४.** महाविद्यालय नविन **रयत शताब्दी** इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकामाच्या कामकाजाबाबत चर्चा करणे.

५. NAAC बंगलोर यांच्याकडे महाविद्यालयाचा AQAR सन २०१९ – २० चा रिपोर्ट पाठविण्यास मंजुरी घेणे.

६. कोव्हीड-19 च्या प्रतिबंधात्मक उपाय योजनेकरिता महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वार परिसरात पिण्याचे पाणी व वॉश बेसिन पाईप लाईन व बांधकामाच्या रक्कम रु. १, ४०, ५७०/- रकमेच्या प्लान –इस्टीमेट व सदर कामास मंजुरी देणे.

**७.** मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेस येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.

कळावे ही विनंती.

O/C

Art's, Science & Com. College ★ Mokhada ★

आपला विश्वासू

प्राचार्य/ सचिव
महाविद्यालय विकास समिती,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
मोखाडा, जि .पालघर

ता. मोखाडा, जि. पालघर – ४०१ ६०४. फोन : (ऑ.) : ०२५२९/२५६६२८, (नि.) : ०२५२९/२५६७०६, (फॅक्स) : ०२५२९/२५६६२८
• Web Site : www.ascmokhada.in • Email ID : ascmokhada@gmail.com

# महाविद्यालय विकास समिती

दि.८/०९/२०२०

महाविद्यालय विकास व्यवस्थापन समितीची सन २०२०-२१ वर्षातील पहिली सभा मंगळवार दि.८/०९/२०२० रोजी दु.१२.३० वा. महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. रामशेठजी ठाकूर साहेब यांचे अध्यक्षतेखाली महाविद्यालयात संपन्न झाली.

या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ. न. | सदस्याचे नाव | | सही |
|---|---|---|---|
| ०१ | मा. रामशेठ ठाकूर (चेअरमन प्रतिनिधी ) | चेअरमन | |
| ०२ | मा. आमदार बाळाराम पाटील (सचिव प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०३ | मा. ॲड. भगिरथ शिंदे (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०४ | मा. आमदार प्रशांत ठाकूर (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०५ | मा. ॲड. देविदास पांडूरंग पाटील (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०६ | मा. कुणाल लाडे (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०७ | प्रा. प्रफुल्ल मनोहर धावणे (प्राचार्य नियुक्त विभाग प्रमुख ) | सभासद | |
| ०८ | प्रा.सैंदनशिव सुभाष एकनाथ (प्राध्यापक प्रतिनिधी ) | सभासद | |
| ०९ | प्रा. जनार्धन भाऊ वारघडे (प्राध्यापक प्रतिनिधी ) | सभासद | |
| १० | प्रा. ममलय्या अमोल बलभीम (प्राध्यापक प्रतिनिधी ) | | |
| ११ | श्री. अविनाश हरिचंद्र पाटील (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) | सभासद | |
| १२ | प्राचार्य, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा | सेक्रेटरी | |

(१)

मोखाडा, जि .पालघर

**रयत शिक्षण संस्थेचे,**

**कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा**

**दि. ०८/९/२०२० रोजीच्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेचा इतिवृत्त अहवाल –**

**दि.२८/०९/२०२१** रोजीच्या सभेचे नियोजित अध्यक्ष मा. रामशेठजी ठाकूर साहेब यांनी स्वीकारावे अशी विनंती प्रभारी प्राचार्य डॉ. नागरगोजे डी. आर.यांनी केली. सदरची विनंती मान्य करून मा. रामशेठजी ठाकूर साहेब यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारून सभेचे कामकाज सुरु केले.

**विषय क्र. १ - मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे-**

**ठराव** - दि. ०६/०६/२०१९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त श्री. धावणे पी. एम. यांनी सभागृहापुढे वाचन करून इतिवृत्त कायम करणेसाठी सभेपुढे ठेवले. सदरच्या इतिवृत्तातील सर्व ठरावांवर चर्चा होऊन सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. २- सन २०२०-२१ वर्षातील महाविद्यालय विद्यार्थी प्रवेश संख्या या बाबत चर्चा करणे.**

**ठराव-** सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयातील व्यवसाय अभ्यासक्रम विभाग, सिनिअर महाविद्यालय विभाग पदव्युत्तर विभाग यांची प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या खालील विद्यार्थी संख्येचे अवलोकन करून या विद्यार्थी प्रवेश संखेस समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

| | Name of Course | No. of Students admitted | | |
|---|---|---|---|---|
| | | TOTAL | | GRAND TOTAL |
| | | M | F | B + G |
| | UNDER GRADUATE | | | |
| 1 | FYBA | 70 | 36 | 106 |
| 2 | FYBCOM | 34 | 13 | 47 |
| 3 | FYBSc | 39 | 23 | 62 |
| 4 | SYBA | 45 | 27 | 72 |
| 5 | SYBCOM | 34 | 08 | 42 |
| 6 | SYBSc | 45 | 16 | 61 |
| 7 | TYBA | 45 | 17 | 66 |
| 8 | TYBCOM | 29 | 11 | 40 |
| 9 | TYBSc | 48 | 20 | 68 |
| | Total A | 393 | 171 | 564 |
| | POST GRADUATE | | | |
| 10 | MA-I | 14 | 01 | 15 |
| 11 | MA-II | 06 | 06 | 12 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Total B | | 20 | 07 | 27 |
| HSVC | | | | |
| 12 | XI P & SK | 22 | 10 | 32 |
| 13 | XI MREDA | 28 | | 28 |
| 14 | XII P & SK | 08 | 06 | 14 |
| 15 | XII MREDA | 14 | - | 14 |
| Total C | | 72 | 16 | 88 |
| Grand Total | | 485 | 194 | 679 |

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ३- सन २०१९-२० वर्षातील महाविद्यालयाचे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी देणे-**

**ठराव-** आर्थिक वर्ष सन २०१९-२० या वर्षासाठी महाविद्यालयाने सुधारित अंदाजपत्रक तयार करून ते मंजुरी साठी संस्थेकडे पाठविण्यात आले होते.त्यास संस्थेने ऑडीट डीपार्टमेंट मार्फत मा.सचिव सो.यांचेकडून या अंदाजपत्रकाच्या सिनियर, व्यवसाय अभ्यासक्रम,पी.जी.विभागाच्या खालील तपशिलाच्या एकूण जमा-खर्चाच्या रक्कमेस मंजुरी दिली आहे.अंदाजपत्रकातील जमा-खर्चाच्या तपशिलाचे समितीने अवलोकन करून त्यावर चर्चा करून या सर्व रक्कमेस **समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.**

| | |
|---|---|
| सिनियरविभाग | ३,२३,८३,३००/- |
| व्यवसायअभ्यासक्रम | ५७,८६,३००/- |
| पी.जी.विभाग | २,२६,०००/- |
| इमारत विभाग | २,४८,४९,६३०/- |

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.४ - महाविद्यालय नविन रयत शताब्दी इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकामाच्या कामकाजाबाबत चर्चा करणे.**

**ठराव-** या इमारत बांधकामाचे भूमिपूजन शुभारंभ आज दिनांक ०८/०९/२०२० रोजी महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले या वेळी मा. अड. भगीरथ शिंदे साहेब, प्राचार्य जे. जी. जाधव साहेब, मा. विभागीय अधिकारी . रायगड विभाग - पनवेल.तसेच महाविद्यालय विकास समितीचे सर्व मान्यवर सदस्य व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

या इमारत बांधकामाचे ठेकेदार श्री संतोष चोथे यांना बांधकाम निविदा मंजूर झालेली असल्याने त्यांना दिनांक २४/०६/२०२० रोजीच्या वर्क ओर्डरला मंजुरी देण्यात आली. तसेच आज

(३)

रोजीपासून त्यांना इमारत बांधकाम करण्यास सुरुवात करावी असे सांगण्यात येऊन त्यांच्याशी या बांधकामाचा करारनामा करण्यात यावा याबाबत चर्चा झाली.

**या वरील सर्व मुद्द्यांवर चर्चा होऊन कामकाजाचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.- ५-**

**NAAC बंगलोर यांच्याकडे महाविद्यालयाचा AQAR सन २०१९ – २० चा रिपोर्ट पाठवून दिलेला आहे. त्यास मान्यता घेणे.**

**ठराव-** NAAC साठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्धतेसाठी नवीन इमारत होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरच्या इमारतीचे आवश्यक बांधकाम पूर्ण झाल्यानंतर NAAC ला सामोरे जाने योग्य होईल NAAC बंगलोर यांच्याकडे महाविद्यालयाचा AQAR सन २०१९ – २० चा रिपोर्ट पाठवून दिलेला आहे. यास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.०६ -**

**कोव्हीड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाय योजनेकरिता महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वार परिसरात पिण्याचे पाणी व वॉशबेसिनपाईप लाईन व बांधकामाच्या रक्कम रु. १, ४०, ५७०/- रकमेच्या प्लान–इस्टीमेट व सदर कामास मंजुरी देणे.**

**ठराव-** सद्यस्थितीत करोना महामारीचा प्रादुर्भाव सुरु असल्याने या कोव्हीड-19 च्या प्रतिबंधात्मक उपाय योजनेकरिता महाविद्यालय सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वार परिसरात पिण्याचे पाणी व वॉशबेसिन प्राईप लाईन करणे आवश्यक असल्याने या कामाच्या प्लान–इस्टीमेट रक्कम रु. १, ४०, ५७०/- ला मंजुरी देऊन सदर कामकाज करण्यास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ७ .**

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेस येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.**

**मुद्दा क्र. १.** मा. रामशेठ ठाकूर साहेब यांचेकडून महाविद्यालयाच्या प्राचार्य केबिन दुरुस्तीसाठी १० ते १५ लाख रुपयापर्यंत देणगी जाहीर केली. या देणगी जाहीर केल्या बाबत समितीने आनंद व्यक्त करून त्यांचे आभार मानले. याबाबत प्लान–इस्टीमेट तयार करून कामकाज लवकर करण्याचे ठरले.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**मुद्दा क्र.** २. मा. रामशेठ ठाकूर साहेब यांना कॉम्पुटर लब विषयी विनंती केल्यानंतर त्यांनी मा.रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर शाखेमार्फत ५ नग संगणक संच देणगी देणे जाहीर केल्यानंतर त्यांनी आपल्याशी संपर्क साधून पाच संगणक संच प्रिंटरसह

(५)

मिळणेबाबत आमच्या विद्यालयास विनंती पत्र देण्यास सूचित केले. या देणगी जाहीर केल्या बाबत समितीने आनंद व्यक्त करून त्यांचे आभार मानले.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**मुद्दा क्र. ३-** मोखाडा महाविद्यालयास रयत शताब्दी इमारत बांधकामासाठी मिळालेल्या ३ कोटी देणगी रक्कमेपैकी २ कोटी ४० लाख इमारत बांधकाम करणेसाठी वापर करून उर्वरित रक्कम रु.६० लाख रक्कमेत अंतर्गत कामकाज १) बेंचेस खरेदी २) फर्निचर बनविणे ३) सुविधा युक्त प्रयोगशाळा तयार करणे ४) कॉम्पुटर लब ई. साठी वापर करण्याचे ठरले. **सदर निर्णय समितीने सर्वानुमते घेऊन ठराव संमत केला.**

सूचक- मा.अड.भगीरथ शिंदे सो.

अनुमोदक – मा. रामशेठ ठाकूर सो.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**मुद्दा क्र. ४-** महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेच्या बॉटनी विषयासाठी बॉटनिकल गार्डनची पूर्व निच्चीत जागा पूर्व बाजूस वर्ग खोल्यांशेजारील जागा निच्चीत केलेली होती. परंतु सदर जागा योग्य नसल्याने व कमी पडत असल्याने पश्चिम दिशेच्या बाजूस नवीन इमारतीच्या शेजारील जागेत बॉटनिकल गार्डन तयार करण्याचे ठरले. या जागा बदलास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**वरील सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.**

**कळावे,**

**चेअरमन**
**महाविद्यालय विकास समिती**

**प्राचार्य/ सचिव**
कला, विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय
मोखाडा, जि.पालघर

रयत शिक्षण संस्थेचे
# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा.
स्थापना : जून १९८४
(उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम - जे. १८. ०२. ९०१)
नॅक मूल्यांकन - 'ब' श्रेणी
संस्थापक - पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (डी.लिट.)

प्रभारी प्राचार्य
डॉ. डी. आर. नागरगोजे
(एम.एससी., पीएच.डी., सेट, नेट)

जा. नं. : २६७/२०२१-
दिनांक २४/०९/२०२१

प्रति,
मा. चेअरमन / सर्व मान्यवर सदस्य,
महाविद्यालय विकास समिती,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
मोखाडा, जि .पालघर.

**विषय : महाविद्यालय विकास समितीच्या सन २०२१– २२ मधील दि.२८/०९/२०२१ रोजीच्या सभेस उपस्थित राहणेबाबत.....**

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मोखाडा महाविद्यालयाच्या "महाविद्यालय विकास समितीची " सन २०२१– २२ मधील **सभा मंगळवार दि.२८/०९/२०२१** रोजी दुपारी १२.३० वाजता महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. रामशेठ ठाकूर साहेब, यांचे अध्यक्षतेखाली महाविद्यालयात आयोजित केलेली आहे. **कृपया आपण या सभेस उपस्थित रहावे ही विनंती.**

**सभेपुढील विषय :**

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षतील झालेल्या प्रवेश संख्या यावर चर्चा करणे.
३. सन २०२०-२१ वर्षातील महाविद्यालयाच्या बोर्ड परीक्षा, कॉलेज परीक्षा व विद्यापीठ परीक्षेचे निकाल सादर करून चर्चा करणे.
४. सन २०२१ -२२ वर्षातील महाविद्यालयाचे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५. महाविद्यालय नविन **रयत शताब्दी** इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकाम सुरु असून या बांधकाम कामकाजाबाबत चर्चा करणे.
६. नवीन इमारतीस वाढीव काम आवश्यक असल्याने या वाढीव कामकाजाबाबत चर्चा करून निर्णय घेणे.
   १) सर्व लाईट फिटिंग करणे २) तळ मजला इमारतीचे पोर्च मधील लोखंडी ग्रील बसविणे
   ३) प्रवेशद्वारा पाशी छत करणे ४) दुसरे मजल्यावरील पावसाचे पाणी पहिल्या मजल्यावर स्ल्याब गळती होऊ नये म्हणून उपाय योजना करणे.
७. महाविद्यालय नवीन रयत शताब्दी इमारत बांधकाम ठेकेदार श्री. संतोष चोथे यांनी इमारत बांधकामाचे वाढीव दर मिळणेबाबतच्या अर्जावर चर्चा करून निर्णय घेणे.
८. महाविद्यालयास इनव्हर्टर साठी बॅटरी , डिपार्टमेंट व वर्ग खोल्यांसाठी फॅन ,वॉटर प्युरीट इ.साहित्य खरेदीस मंजुरी घेणे.
९. NAAC बंगलोर यांच्याकडे महाविद्यालयाचा AQAR सन २०२० – २१ चा रिपोर्ट पाठविण्यास मंजुरी घेणे.
१०. सन २०२१-२२-वर्षात CHB शिक्षक सेवक नेमणुकीस व त्यांच्या दरमहा मानधन खर्चास मंजुरी देणे.

रयत शिक्षण संस्थेचे

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा.

स्थापना : जून १९८४

(उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम - जे. १८. ०२. ९०१)

नॅक मूल्यांकन - 'ब' श्रेणी

संस्थापक - पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (डी.लिट.)

प्रभारी प्राचार्य
डॉ. डी. आर. नागरगोजे
(एम्.एस्सी., पीएच.डी., सेट, नेट)

(२)

जा. नं. : २६७/२०२१-२२
दिनांक : २४/०८/२०२१

११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेस येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.

कळावे,

आपला विश्वासू

प्राचार्य/ सचिव
महाविद्यालय विकास समिती,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
मोखाडा, जि .पालघर

Art's, Science & Com. College
Mokhada

# महाविद्यालय विकास समिती

महाविद्यालय विकास व्यवस्थापन समितीची सन २०२१-२२ वर्षातील सभा मंगळवार दि. २८/०९/२०२१ रोजी दुपारी १२.३० वा. चेअरमन मा. रामशेठजी ठाकूर यांचे अध्यक्षतेखाली महाविद्यालयात संपन्न झाली. या सभेस खालील मान्यवर सदय उपस्थित होते.

| अ. न. | सदस्याचे नाव | | सही |
|---|---|---|---|
| 01 | मा. रामशेठ ठाकूर साहेब (चेअरमन प्रतिनिधी ) | सभासद | [signature] |
| 02 | मा. आमदार,बाळाराम पाटील (सचिव प्रतिनिधी ) | सभासद | — |
| 03 | मा. अ‍ॅड. भगिरथ शिंदेसाहेब (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | [signature] |
| 04 | मा. आमदार प्रशांत ठाकूर (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | — |
| 05 | मा. कुणाल लाडे (स्थानिक प्रतिनिधी ) | सभासद | — |
| 06 | प्रा. प्रफुल्ल मनोहर धावणे (प्राचार्य नियुक्त विभाग प्रमुख ) | सभासद | |
| 07 | प्रा सैंदनशिव सुभाष एकनाथ (प्राध्यापक प्रतिनिधी ) | सभासद | [signature] |
| 08 | श्री. अविनाश हरिचंद्र पाटील (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) | सभासद | [signature] |
| 09 | प्राचार्य, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,, मोखाडा. | सभासद | [signature] 28.09.21 |
| 10 | मा. डॉ. जे. जी. जाधव [माजी प्राचार्य | निमंत्रीत सभासद | [signature] 28.9.21 |
| ११ | प्रा. डॉ. ममलय्या ए. बी. [प्राध्यापक प्रतिनिधी | निमंत्रीत | [signature] |
| १२ | | | |

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
मोखाडा, जि .पालघर

रयत शिक्षण संस्थेचे,

**कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा**

दि. २८/९/२०२१ रोजीच्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेचा इतिवृत्त अहवाल –

---

**विषय क्र. १ - मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे-**

**ठराव** - दि. २८/०९/२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त श्री.पाटील ए.एच. यांनी सभागृहापुढे वाचन करून इतिवृत्त कायम करणेसाठी सभेपुढे ठेवले. सदरच्या इतिवृत्तातील सर्व ठरावांवर चर्चा होऊन सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करून कायम करण्यात आले.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. २- सन २०२१-२२ शैक्षणिक वर्षातील झालेल्या महाविद्यालय विद्यार्थी प्रवेश संख्या या बाबत चर्चा करणे.**

**ठराव**- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालयातील व्यवसाय अभ्यासक्रम विभाग, सिनिअर महाविद्यालय विभाग पदव्युत्तर विभाग यांची प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या खालील विद्यार्थी संख्येचे अवलोकन करून या विद्यार्थी प्रवेश संखेस समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

## Students Admission Chart Yr. 2021-22

| Sr. No. | Name of Course | No. of Students admitted | | |
|---|---|---|---|---|
| | | TOTAL | | GRAND TOTAL |
| | | M | F | B + G |
| | **UNDER GRADUATE** | | | |
| 1 | FYBA | 33 | 15 | 48 |
| 2 | FYBCOM | 17 | 17 | 34 |
| 3 | FYBSc | 10 | 29 | 29 |
| 4 | SYBA | 47 | 27 | 74 |
| 5 | SYBCOM | 28 | 05 | 33 |
| 6 | SYBSc | 28 | 21 | 49 |
| 7 | TYBA | 36 | 24 | 60 |
| 8 | TYBCOM | 28 | 08 | 36 |
| 9 | TYBSc | 43 | 16 | 59 |
| | **Total A** | **269** | **153** | **422** |
| | **POST GRADUATE** | | | |
| 10 | MA-I | 19 | 04 | 23 |
| 11 | MA-II | -- | -- | -- |
| | **Total B** | **19** | **04** | **23** |
| | **HSVC** | | | |
| 12 | XI P & SK | 12 | 08 | 20 |

2

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | XI MREDA | 15 | 00 | 15 |
| 14 | XII P & SK | 14 | 13 | 27 |
| 15 | XII MREDA | 14 | 00 | 14 |
| Total C | | 55 | 21 | 76 |
| Grand Total | | 343 | 178 | 521 |

--- ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय क्र. ३- सन २०२०-२१ वर्षातील महाविद्यालयाच्या बोर्ड परीक्षा, कॉलेज परीक्षा व विद्यापीठ परीक्षेचे निकाल -**

**परीक्षा निकाल एप्रिल/मे२०२१**

| अ.क्र. | वर्ग | बोर्ड/महाविद्यालय विद्यापीठ | एकूण परीक्षेस बसलेले विद्यार्थी | पास विद्यार्थी | अनुत्तीर्ण विद्यार्थी | शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२ वी पर्चेसिंग | बोर्ड | १५ | १५ | ० | १००% |
| २ | १२ वी इलेक्ट्रिकल टेक्नो. | बोर्ड | १४ | १४ | ० | १००% |
| | १२ वी एकूण | बोर्ड | २९ | २९ | ० | १००% |
| ३ | प्रथम वर्ष कला | महाविद्यालय | ८१ | ७३ | ८ | ९०.१२% |
| ४ | प्रथम वर्ष वाणिज्य | महाविद्यालय | ३९ | ३९ | ० | १००% |
| ५ | प्रथम वर्ष विज्ञान | महाविद्यालय | ५२ | ५० | २ | ९६.१३% |
| ६ | द्वितीय वर्ष कला | महाविद्यालय | ६८ | ६८ | ० | १००% |
| ७ | द्वितीय वर्ष वाणिज्य | महाविद्यालय | ३८ | ३५ | ३ | ९२.१०% |
| ८ | द्वितीय वर्ष विज्ञान | महाविद्यालय | ६० | ६० | ० | १००% |
| ९ | तृतीय वर्ष कला | विद्यापीठ | ६३ | ५७ | ६ | ९२.०६% |
| १० | तृतीय वर्ष वाणिज्य | विद्यापीठ | ३९ | ३५ | ४ | ९२.१०% |
| ११ | तृतीय वर्ष विज्ञान | विद्यापीठ | ६६ | ६३ | ३ | ९५.४५% |
| १२ | एम.ए. I | विद्यापीठ | १३ | - | - | - |
| १३ | एम.ए. II | विद्यापीठ | ११ | ११ | ० | १००% |

Arts, Sc... College Mokhada



**विषय क्र. ४- सन २०२१ -२२ वर्षातील महाविद्यालयाचे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी देणे.**

**ठराव-** आर्थिक वर्ष सन २०२१ -२२ या वर्षासाठी महाविद्यालयाने मूळ अंदाजपत्रक तयार करून ते मंजुरी साठी संस्थेकडे पाठविण्यात आले होते.त्यास संस्थेने ऑडीट डीपार्टमेंट मार्फत मा.सचिव सो.यांचेकडून या अंदाजपत्रकाच्या सिनियर, व्यवसाय अभ्यासक्रम,पी.जी.विभाग व इमारत विभागाच्या खालील तपशिलाच्या एकूण जमा-खर्चाच्या रक्कमेस मंजुरी दिली आहे.अंदाजपत्रकातील जमा-खर्चाच्या तपशिलाचे समितीने अवलोकन करून त्यावर चर्चा करून या सर्व रक्कमेस **समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.**

| | |
|---|---|
| सिनियरविभाग | ३,९९,९३,८००/- |
| व्यवसाय अभ्यासक्रम | ७२,७१,७००/- |
| पी.जी.विभाग | १,६८,६००/- |
| इमारत विभाग | २५,७५,000/- |

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ५ - महाविद्यालय नविन रयत शताब्दी इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकाम सुरु असून या बांधकाम कामकाजाबाबत चर्चा करणे.**

**ठराव-** महाविद्यालयाचे रयत शताब्दी इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकाम सुरु आहे. सदरचे आज अखेर बांधकाम हे तळमजला व पहिला मजला इमारतीवरील वरील स्लॅब,वीटकाम ,आतील प्लास्टरकाम , खिडकी ग्रील ,दरवाजे चौकटी इत्यादी कामकाज पूर्ततेवर चर्चा झाली. तसेच अपूर्ण कामकाज दरवाजे बसविणे ,बाहेरील प्लास्टरकाम ,खिडक्या बसविणे ,फरशी बसविणे, प्लंबिंग काम ,रंगकाम, इत्यादी बाबत चर्चा होऊन मा.रामशेठ ठाकूर साहेब व मा.ॲड.भगीरथ शिंदे साहेब व सर्व समितीने ठेकेदार श्री.संतोष चोथे यांना या कामकाजाबाबत आवश्यक त्या सुचाना देऊन काम १५ नोव्हेंबर २०२१ पर्यंत पूर्ण करून देणेस सांगितले.
तरी याबाबत कामकाजाविषयी चर्चा झाली.
**या वरील सर्व मुद्द्यांवर चर्चा होऊन कामकाजाचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.६ -. नवीन इमारतीस वाढीव काम आवश्यक असल्याने या वाढीव कामकाजाबाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

**१) सर्व लाईट फिटिंग करणे २) तळ मजला इमारतीचे पोर्च मधील लोखंडी ग्रील बसविणे**

Arts Science & Com College Mokhada



**३) पहिल्या मजल्याच्या स्लॅबवरील अती पावसाचे पाणीमुळे स्लॅब गळती होऊ नये म्हणून उपाय योजना करणे-**

**ठराव-** महाविद्यालयाचे रयत शताब्दी इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकाम सुरु आहे.या इमारतीमध्ये खालील वाढीव काम करणे आवश्यक असल्याने सदरचे विषयावर चर्चा होऊन समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहे.

१) **लाईट फिटिंग करणे** – इमारतीच्या वर्गखोल्या मध्ये आवश्यक वर्ग निच्चीत करून त्यानुसार लाईट फिटिंग करावी असे सर्वानुमते ठरले.

२) **तळ मजला इमारतीचे पोर्च मधील लोखंडी ग्रील बसविणे** –

तळ मजला इमारतीच्या पूर्व व पश्चिम बाजूचे पोर्च /व्हरांडा पाच फूटी कट्टा बांधलेला असून त्यावरील उर्वरीत भाग मोकळा ठेवण्यात आलेला आहे.तरी या पोर्च /व्हरांडा मध्ये सुरक्षतेच्या दृष्टीने लोखंडी ग्रील बसविणे आवश्यक असल्याने यावर समितीने चर्चा करून या कामास मंजूरी दिली.

३) **पहिल्या मजल्याच्या स्लॅबवरील अती पावसाचे पाणीमुळे स्लॅब गळती होऊ नये म्हणून उपाय योजना करणे-**

महाविद्यालयाचे रयत शताब्दी इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकाम होत आहे. येथील पावसाळयात अती पावसाचे प्रमाण असल्याने या इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या स्लॅबवर भविष्यात स्लॅब गळती होऊ शकते. त्यासाठी याबाबीवर उपाय योजना करणे आवश्यक असल्याने समितीने यावर चर्चा करून दुसरा मजला बांधने गरजेचे असून, यासाठी पत्राशेडचे इमारत बांधकाम करावे असे सूचित केले. तसेच यासाठी स्वतंत्र प्लॅन – इस्टीमेट तयार करावे असे ठरले.त्यास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.७ - महाविद्यालय नवीन रयत शताब्दी इमारत बांधकाम ठेकेदार श्री. संतोष चोथे यांनी इमारत बांधकामाचे वाढीव दर मिळणेबाबतच्या अर्जावर चर्चा करून निर्णय घेणे.**

**ठराव-** महाविद्यालयाचे रयत शताब्दी इमारतीचे तळमजला व पहिला मजला इमारत बांधकाम सुरु आहे.सदरचे इमारत बांधकाम श्री.संतोष चोथे –साहिल कन्स्ट्रक्शन,मोखाडा यांना दिलेले आहे.श्री. चोथे यांनी दि.०८/०४/२०२१ रोजी महाविद्यालयास त्यांनी या इमारत बांधकामाच्या मटेरियल दराचे बाजार भावामध्ये वाढ झाली असल्याने ,या टेंडर दरापेक्षा वाढीव दर मिळावेत असे विनंती पत्र दिलेले आहे. त्यानुसार समितीने त्यांचेशी या बाबीवर चर्चा करून त्यांचे बांधकामाचे अंतीम देय बीलाच्यावेळेस त्यांच्या या अर्जावर निर्णय घेऊ.असे सूचित केल्याने त्यास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.८- महाविद्यालयास इनव्हर्टर साठी बॅटरी , डिपार्टमेंट व वर्ग खोल्यांसाठी फॅन , वॉटर प्युरीट इ.साहित्य खरेदीस व खर्चास मंजुरी देणे-**

**ठराव** –महाविद्यालयाने सन २०२१-२२ वर्षात खालील साहित्य खरेदी केलेली आहेत. या आवश्यक खरेदीस व **एकूण रक्कम रु. ३,७०,१३५/-**च्या खर्चास समितीपुढे कार्योत्तर मंजुरी साठी ठेवण्यात आले. त्यावर समितीने चर्चा करून या खरेदीस व खर्चास सर्वानुमते मंजूरी दिली.

| अनुक्र. | साहित्याचे नांव | संख्या | दर रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | **Inverter Battery- Luminous Extra Power-**<br>१. प्राचार्य केबिन<br>२. विद्यापीठ परीक्षा DEPD विभाग<br>३. महाविद्यालयकार्यालय विभाग व संगणक विभाग<br>४. कॉलेज परीक्षा विभाग<br>५. डीपार्टमेंट –आर्ट्स व कॉमर्स विभाग<br>६. सायन्स लॅब / MCVC विभाग/ नॅक डीपार्टमेंट | ०२ नग<br>०२ नग<br>०४ नग<br>०२ नग<br>०२ नग<br>०२ नग | प्रत्येकी- ०१ प्रमाणे **२१,६३२/- GST - २८% सह**<br>**एकूण रक्कम – रु. ३०२८४८/-** | यासर्व बॅटरी सन २०१७ मध्ये खरेदी केलेल्या होत्या. मागील लॉकडाऊन कार्यकाळात या बॅट-या खराब झालेल्या असल्याने तसेच मोखाडा येथे लाईट सतत जात असल्याकारणानेया सर्व विभागासाठी सदर साहित्य खरेदीची अत्यंत आवश्यकता आहे. |
| २. | **सिलिंग फॅन— CR Branded**<br>**वॉल फॅन -- CR** | ०५ नग<br>०५ नग | **३२४५/-**<br>**३३९२/-**<br>GST -१८% सह<br>**एकूण रक्कम रु. ३३,१८८/-** | वर्गातील काही फॅन नादुरुस्त व खराब झालेले आहेत. तसेचडीपार्टमेंट मध्ये फॅन नसल्याने तेथे बसविणे आवश्यक आहे. |
| ३. | **वॉटर प्युरीफायर (मोठे) --** | ०१ नग | रु.३४१०२/-<br>GST -१८% सह<br>**एकूण रक्कम- रु.३४,१०२/-** | महाविद्यालयातील विद्यार्थी वर्गासाठी व स्टाफ करीता शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी प्युरीफायर खरेदी करणे आवश्यक आहे. |
| | **एकूण रक्कम रु. ३,७०,१३५/-** | | | |

**---- ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.- ९- NAAC बंगलोर यांच्याकडे महाविद्यालयाचा AQAR सन २०२० – २१ चा रिपोर्ट पाठविण्यास मंजुरी घेणे.**

ठराव- महाविद्यालायचे प्रथम NAAC मुल्यांकन सन २०१३-१४ मध्ये झाले आहे. त्यामध्ये महाविद्यालयाला २.२१ हि ग्रेड मिळाली. फेब्रुवारी २०१९ मध्ये प्रथम मुल्यांकनाची ५ वर्षे पूर्ण होतात. महाविद्यालयाचे द्वितीय NAAC मूल्यांकन करणे आवश्यक आहे. सदर NAAC च्या द्वितीय मूल्यांकनासाठी प्रथम NAAC मुल्यांकन समितीने सुचविलेली सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नवीन इमारत होणे गरजेचे आहे. या रिपोर्टची आवश्यक पूर्तता करून NAAC ला सामोरे जाणे सोयीचे होईल. त्यानुसार इतर सर्व आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे सोपे होईल.

तसेच NAAC - बेंगलोर यांच्याकडे महाविद्यालयाचा AQAR सन २०१९ – २० चा रिपोर्ट पाठवून दिलेला आहे. तसेच सन २०२०-२१ चा AQAR रिपोर्ट डिसेंबर २०२१ पर्यंत पाठवावयाचा आहे. यास समितीने सर्वानुमते मंजुरी दिली.

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र.- १०- सन २०२१-२२-वर्षात CHB शिक्षक सेवक नेमणुकीस व त्यांच्या दरमहा मानधन खर्चास मंजुरी देणे-**

**ठराव-** महाविद्यालयातील सन २०२१-२२ वर्षात स्थानिक तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात (CHB ) खालील विषयांच्या अध्यापनासाठी दि.०१/८/२०२१ पासून नेमणुका केलेल्या आहेत. या शिक्षकानां दरमहा पगार मानधन देण्यात येत आहे. या दरमहा मानधन खर्चास व नेमणुकीस मान्यता देणेस समितीने सर्वानुमते मंजूरी दिली.

| अनु.क्र. | सेवकाचे नांव | विषय | मानधन रक्कम |
|---|---|---|---|
| १. | श्री. भोये दत्तात्रय रघुनाथ | इतिहास | ८०००/- |
| २. | श्री. खंबाईत महेंद्र रामचंद्र | अर्थशास्त्र | ८०००/- |
| ३. | श्री.घाटाळ राजेंद्र देवराम | मराठी | ८०००/- |
| ४. | श्री. नाडेकर प्रमोद लहानू | मानसशास्त्र | ८०००/- |
| ५. | श्री. चोथे विश्वास गणपत | अकौंटन्सी | ८०००/- |
| ६. | श्री. डॉ. डोंगरदिवे वासुदेव महादेव | पी.जी. विभाग – इतिहास | १०,०००/- |

**---- ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्र. ११. - मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेस येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे.**

**मुद्दा क्र. १-** महाविद्यालय विकास समितीवरील सदस्य कै.देविदास पांडुरंग पाटील यांच्या रिक्त झालेल्या सदस्यपदी मोखाडा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी मा. आमदार सुनील चंद्रकांत भुसारा यांना या महाविद्यालय विकास समितीवर घ्यावे असे ठरले. यास समितीने सर्वानुमते मान्यता दिली. या नवीन सदस्य निवडीबाबत त्यास संस्थेची मंजुरी घ्यावी असे ठरले.

(7)

**मुद्दा क्र. २-**

